# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०७/०३/२०१९
## दि.०६/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे २१३/१९,भादविक २७९,३०४(अ),३३८,मोव्हे.१८४,१३२(१)(क), ११९/१७७ |
| **फिर्यादी** | ज्ञानेश्वर शिंदे,वय-५६ वर्षे,रा.सहजपुर,माकरवस्ती,ता.दौंड,जि.पुणे |
| **आरोपी** | टँकरवरील अज्ञात चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०२/२०१९ रोजी सकाळी १२/०० ते १३/०० वा.चे दरम्यान द्राक्ष संशोधन केंद्राचे थोडे पुढे मांजरी,ता.हवेली,जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा किरण ज्ञानेश्वर शिंदे,वय-२२,रा.सहजपुर, माकरवस्ती,ता. दौंड,जि.पुणे हा मोटार सायकलवरुन सोलापुर-पुणे रोडने हडपसर बाजुकडे जात असताना द्राक्ष संशोधन केंद्राचे थोडे पुढे यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील टँकर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी किरण शिंदे यांस पाठीमागुन जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन, अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. (फिर्यादी हे मयतास त्यांचे गावी सहजपुर,माकरवस्ती,ता.दौड,जि.पुणे येथे नेवुन त्याचा अंत्यविधी करून आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.हवा. शिंगाडे ९६३७१०५०७७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे २१३/१९,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | विशाल चात्रे,वय-२९ वर्षे,रा.आदर्श इंदीरानगर,येरवडा,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात वाहन चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०३/२०१९ रोजी १९/१५ वा. आर.टी.ओ. ऑफीसकडे जाणा-या भुयारी मार्गा शेजारील, आदर्श इंदीरानगरचे बाजुचे बी.आर.टी. मार्गा मध्ये येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा भाऊ गोपाळ मारुती चात्रे,वय-३५ वर्षे,रा.सर्वे नं.९०,आदर्श इंदीरानगर, पुणे-आळंदी रोड,येरवडा,पुणे हे नमुद ठिकाणी रस्ता ओलांडत असताना,यातील नमुद अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी गोपाळ मारुती चात्रे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्यांचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. घुगे ९५५२५९०३४७ |

**प्रेसनोट** दिनांक २५/०२/२०१९

**छायाचित्र स्पर्धा** "पोलीस इन अँक्शन नागरीकांची सेवा आणि सुरक्षितेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर विनामुल्य छायाचित्र स्पर्धेबाबत.

पुणे पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या संकल्पनेतून १. प्रेस/ प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार ३. पोलीस खात्यातील अधिकारी/कर्मचारी त्यांचे कुटूंबिय या गटांकरीता "पोलीस इन अँक्शन - नागरीकांची सेवा आणि सुरक्षिततेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर **विनामुल्य छायाचित्र** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेकरीता हौशी छायाचित्रकार या गटांमध्ये कोणीही नागरिक सहभागी होवु शकतो.

सदर स्पर्धेकरीता प्रथम क्रमांक - रोख ५००० रू व शिल्ड, द्वितीय क्रमांक, - रोख ३००० रू व शिल्ड, तृतीय क्रमांक - रोख २००० रू व शिल्ड व उत्तेजनार्थ २ बक्षीसे देण्यात येणार आहेत.

प्रवेशिका http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळावर उपलब्ध असून फोटो (इमेज) वरील दिलेल्या संकेत स्थळावर **ऑनलाईन** पाठवावेत.

**स्पर्धेसाठीचे नियम व अटी-**

१. प्रत्येक स्पर्धकाने जास्तीत जास्त ५ इमेज JPG फॉरमॅटमध्ये ३०० DPI 5 MB साईजचे ओरीजनल व स्वत काढलेल्या इमेज असाव्यात. इमेजवर कोणत्याही प्रकारचे वॉटरमार्क, लोगो, चिन्ह नसावे
२. दिनांक २५/०२/२०१९ रोजीची ही मुदत दि.१२/०३/२०१९ पर्यंत वाढविली असुन दि.१२/०३/२०१९ पर्यंत प्रवेशिका व फोटो नमुद संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील
३. निवड झालेले फोटोग्राफ्स हे आयोजक आपल्या प्रदर्शनासाठी व माहिती पुस्तीकेसाठी वापरू शकतील.
४. इमेज पाठविण्यासाठी http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळाचा वापर करावा. सदरचे संकेतस्थळ **रजिस्ट्रेशन केल्यानंतरच** या स्पर्धेत भाग घेता येईल.
५. प्रत्येक स्पर्धकाने त्याचा ईमेल आयडी व मोबाईल नंबर देणे आवश्यक आहे.
६. मोबाईल किंवा स्मार्ट फोन ने काढलेली छायाचित्रे सुध्दा स्पर्धेत पाठविता येतील.
७. फोटोग्राफ निवडीसाठी परीक्षक समितीचा निर्णय अंतिम राहील.

**छायाचित्र स्पर्धेसाठी पुणे शहरातील १. प्रेस/प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार, ३. पोलीस अधिकारी / कर्मचारी तसेच त्यांचे कुटूंबिय असे गट आहेत. हौशी छायाचित्रकार गटात सर्व कॉलेजचे प्रिन्सीपल,व्याख्याते, कॉलेज विद्यार्थी, शिक्षकवृंद, सर्व पत्रकार, उत्सुक व इच्छुक नागरीक यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा. असे पुणे पोलीसांकडून आवाहन करण्यात येत आहे.**

**अधिक माहितीसाठी- संपर्क अधिकारी-**

१. श्री. अजित लकडे, पोलीस निरीक्षक, विशेष शाखा, पुणे शहर.- ८३२९८०४८३६




# Police in Action

## for Service & Security of People

Pune Police



### Photography Contest!

Open to All!

Participate, in one of three groups:

1. **Amateur/ Hobby Photographers**
2. **Police officers, staff & members of their families**
3. **Press/ Professional Photographers**

Prizes in each Group!

1st: **Rs. 5,000**

2nd: **Rs. 3,000**

3rd: **Rs. 2,000**

Two more consolation prizes

**Entry Free!**

Last Date Extended ...

**12 March 2019**

To take part & know more, go to

**www.pixlent.com/punepolicephotocontest**

जनसंपर्क अधिकारी,

पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर